# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०४/२०२४ (बुधवार) सकाळ**

---

## अवैधरीत्या देशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ०९/०४/२०२४ रोजी पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ पोस्टे कळमेश्वर हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे खबर मिळाली की, आष्टीकला येथे एक इसम आष्टीकला गावातील चौकात गाडी उभी करून गाडीवर थैली ठेवुन थैलीत अवैद्यरित्या देशी दारु बाळगुन त्याची विक्री करीत आहे. अशा खबरे वरुन आष्टीकला हनुमान मंदिर समोरील चौकात नाकाबंदी केली असता एक इसम पॅशन मोटर सायकल वर बसलेला **आरोपी नामे– सचिन अशोकरावजी पुंड, वय ३२ वर्ष, रा. आष्टीकला ता. कळमेश्वर** याची मोटरसायकल क्र. एम. एच–४०/एस. आर–७३०२ वर ठेवलेल्या थैलीमध्ये १) देशी दारुच्या १८० एम. एल. च्या ८ निपा एकुण १४४० एम.एल. प्रती निप किंमत रु. ८०/– प्रमाणे एकुण किमंती ६४०/–रू. २) एक फैशन मो.सा क्र. एम.एच–४० एस आर–७३०२ ची किंमती रु. २०,०००/– असा एकुण किंमत २०,६४०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूद्ध कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. योगेश कामाले, पोहवा किशोर लोही, पोशि महेश कुमेरीया यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर